# जे. एस. एम. महाविद्यालय, अलिबाग
## मराठी विभाग
## राष्ट्रीय परिसंवाद - 'भारतीय भाषा, साहित्य व संस्कृती : जागतिकीकरणाच्या संदर्भात'

जे.एम.एस. महाविद्यालयात दिनांक ०५ मार्च २०१९ रोजी **'भारतीय भाषा, साहित्य व संस्कृती: जागतिकीकरणाच्या संदर्भात** 'या विषयावरील एक दिवसीय राष्ट्रीय परिसंवादाचे आयोजन महाविद्यालयाच्या 'अंतर्गत गुणवत्ता निर्धारण समिती' व मराठी, हिंदी, इंग्रजी या विभागांतर्फे करण्यात आले होते .

जागतिकीकरणाचे परिणाम मानवी जीवनाच्या सर्वच क्षेत्रांवर झाले आहेत. भाषा, साहित्य व संस्कृती ही क्षेत्रेही त्याला अपवाद नाहीत. गेल्या दोन दशकात भारतीय भाषा, साहित्य व संस्कृती यांवर जागतिकीकरणाचे बहुआयामी परिणामी झाले आहेत. या परिणामांची चर्चा करून सखोल विश्लेषण व्हावे या हेतूने जे.एस.एम. महाविद्यालयात 'भारतीय भाषा साहित्य व संस्कृती : जागतिकीकरणाच्या संदर्भात' या विषयावरील एक दिवसीय राष्ट्रीय परिसंवादाचे आयोजन करण्यात आले. या परिसंवादामध्ये महाराष्ट्रातील व महाराष्ट्राबाहेरील विद्यापीठांतील ८९ संशोधक, अभ्यासक तसेच विद्यार्थी सहभागी झाले व त्यांनी विविध विषयांवरील आपले शोधनिबंध सादर केले.

या परिसंवादाचे उद्घाटन सकाळी ठीक १०:०० वाजता मा.ॲड.गौतम पाटील, उपाध्यक्ष, जनता शिक्षण मंडळ, अलिबाग-रायगड यांच्या हस्ते झाले. यावेळी बिजभाषक म्हणून डॉ.दिलीप चव्हाण, महाविद्यालयाचे प्राचार्य मा.डॉ.अनिल पाटील, उपप्राचार्य डॉ.नीळकंठ शेरे, उपप्राचार्य प्रा.अविनाश ओक, जनता शिक्षण मंडळाचे ओ.एस.डी.प्रा.सुरेंद्र दातार हे उपस्थित होते.

डॉ.जसवंतभाई पंड्या, प्रोफेसर आणि अध्यक्ष पदव्युत्तर हिंदी विभाग, गुजरात विद्यापीठ यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या पहिल्या सत्रात डॉ.अनवर अहमद सिद्दिकी, म.गां.अं.हिंदी विश्वविद्यालय, अनुवाद विभागाध्यक्ष, डॉ.राजशेखर मठपती, सहाय्यक प्राध्यापक, इंग्रजी विभाग, गव्हर्नमेंट फर्स्ट ग्रेड कॉलेज, विजयनगर, बंगळूरू, या अभ्यासकांनी **'जागतिकीकरण : साहित्य, भाषा व संस्कृती'** या विषयावरील आपले शोधनिबंध सादर केले.

डॉ.सत्यवान हनेगावे, सहयोगी प्राध्यापक, इंग्रजी विभाग क.ज.सोमय्या महाविद्यालय, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या दुसऱ्या सत्रात डॉ.रामचंद्र काळुंखे, व्ही.पी.एस.पी.एम.एस. कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, कन्नड, औरंगाबाद, डॉ.मोहसीन खान, विभागाध्यक्ष, हिंदी विभाग, जे.एस.एम. कॉलेज, अलिबाग, डॉ.सुधीर निकम, प्रमुख, इंग्रजी विभाग, बी.एन.एन.कॉलेज, भिवंडी या अभ्यासकांनी **जागतिकीकरण : वाङ्मयप्रकार आशय आणि रूपपरिवर्तन** या विषयावरील आपले शोधनिबंध सादर केले.

डॉ.अनिल सपकाळ, प्रमुख, मराठी विभाग, मुंबई विद्यापीठ, डॉ.अनिल सिंह, सोनुभाऊ बसवंत महाविद्यालय, शहापूर-ठाणे, यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या खुल्या सत्रात **जागतिकीकरण : सामाजिक चळवळी आणि साहित्यातील विविध प्रवाह** या विषयावरील शोधनिबंध अभ्यासकांनी सादर केले. परिसंवादाचा समारोप समारंभ संध्याकाळी ठीक ०५:०० वाजता महाविद्यालयचे प्राचार्य मा.डॉ.अनिल पाटील यांच्या अध्यक्षतेखाली प्रा.डॉ.सुरेंद्र जोंधळे, माजी विभागप्रमुख, राज्यशास्त्र, मुंबई विद्यापीठ यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.